# वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड
## मराठी विभाग २०२५-२६
## भित्तीपत्रक प्रकाशन
### सूचना

दि. १/१०/२०२५

मराठी विभागातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, राज्य मंत्रिमंडळाने दि.३ ऑक्टोंबर हा दिवस 'मराठी अभिजात भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे दि. ३ ऑक्टोबर, २०२५ रोजी 'मराठी अभिजात भाषा गौरव दिन' निमित्त भित्तीपत्रकाचे प्रकाशन मा. प्राचार्य यांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे. सर्वांनी सकाळी ९ वाजता उपस्थित रहावे.

मराठी विभाग प्रमुख

प्राचार्य

# वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड
# मराठी विभाग २०२५-२६
# भित्तीपत्रक प्रकाशन
## अहवाल

महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने दि. ३ ऑक्टोंबर हा दिवस ‘मराठी अभिजात भाषा गौरव दिन’ म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. मराठी भाषा विभागाने भाषा संचालनालय, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, साहित्य संस्कृती महामंडळ, राज्य मराठी विकास संस्था यांच्या माध्यमातून मराठीचा अखंड जागर सुरू ठेवला आहे. मराठी साहित्य परिषद आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे मराठी भाषकांसह मराठीवर प्रेम करणाऱ्यांसाठी पर्वणी ठरत आले आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याने मराठी भाषेच्या विकासासाठी आणखी ऊर्जा, प्रेरणा मिळाली आहे. मराठी भाषेचे विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. रिद्धपूर येथे या विद्यापीठाचे मुख्यालय असणार आहे. मराठी भाषेतील अभ्यास, संशोधन याला चालना देता येणार आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळणे जगभरातील मराठी प्रेमींसाठी अभिमानास्पद, गौरवास्पद आहे. मराठीला अभिजात दर्जा मिळाल्याने भाषा संवर्धनाच्या दृष्टीने मराठीच्या बोलींचा अभ्यास, संशोधन, साहित्यसंग्रह करणे, भारतातील सर्व विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सोय करणे. प्राचीन ग्रंथ अनुवादित करणे, महाराष्ट्रातील सर्व ग्रंथालयांचे बळकटीकरण, मराठीच्या उत्कर्षासाठी काम करणाऱ्या संस्था, व्यक्ती, विद्यार्थ्यांना भरीव मदत करणे या गोष्टी साध्य होतील.

दि. ३ ऑक्टोबर, २०२५ रोजी ‘मराठी अभिजात भाषा गौरव दिन’ निमित्त ‘मराठी अभिजात भाषा’ या विषयावर भित्तीपत्रक मराठी विभागातील विद्यार्थिनी कु. अनुजा मोरे व कु. सायली यादव यानी तयार  केले. सदर भित्तीपत्रकाचे प्रकाशन महाविद्यालयाचे मा. प्राचार्य प्रा. डॉ. आर. आर. जाधव यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी प्रा. डॉ. आर. आर. थोरात, मराठी विभाग प्रमुख प्रा. एस. एस. बोंगाळे, IQAC समन्वयक प्रा. डॉ. जे. यु. दीक्षित, प्रा. एम. एस. बागवान, प्रा. पी.एस. कराडे प्रा. डॉ. श्रीमती एन.एस. देसाई, प्रा. व्ही.आय. आंबेकरी, प्रा. पी. एस. चोपडे व महाविद्यालयातील मराठी विभागाचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते..

स्थळ: कराड<br>
शुक्रवार, दि. ०३.९.२०२५<br>
सकाळी ९:०० वाजता

मराठी विभाग प्रमुख

प्राचार्य,<br>
वेणूताई चव्हाण कॉलेज,<br>
कराड<br>
प्राचार्य

स्थापना
१ मे १९७१

# भित्तीपत्रक प्रकाशन काही क्षणचित्रे






वेणूताई चव्हाण कॉलेज
स्थापना
१ मे १९७१
कराड







मराठी विभाग प्रमुख

प्राचार्य,
वेणूताई चव्हाण कॉलेज,
कराड.

प्राचार्य